# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


क्रमांकः२अ/एडीएम/२००८/१८६१
दिनांक : ११.०७.२००८

प्रति,
प्राचार्य/संचालक ,
संचालनालयाच्या अधिनस्त सर्व विनाअनुदानीत अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासाक्रम चालविणा-या संस्था

विषय : अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांमधील होणा-या प्रवेशाबाबत.....

शैक्षणिक वर्ष २००८-०९ मधील अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या सर्व संस्थांना शासकीय केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान होणा-या प्रवेश फेरीमध्ये प्रवेश ॲलॉट केलेल्या उमेदवारांनी संस्थेमध्ये प्रवेश निश्चित केल्यास त्याची माहिती त्याच वेळेस त्वरीत संगणकावर अपडेट करून संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावी. जेणेकरून प्रवेशित उमेदवारांचे प्रवेश वेळोवेळी अद्ययावत होऊन कट ऑफ डेटनंतर अपलोड करण्याचा व परिणामी संस्थेस दंड भरण्याची कारवाई टळेल.

तसेच जर संस्थांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश ॲलॉट झालेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर त्याची माहिती विहीत कालावधीत संगणकावर अपडेट केली नाही तर ती जागा रिक्त धरून पुढील प्रवेश फेरीसाठी सदर जागा ग्राहय धरली जाईल आणि सदर उमेदवाराचा प्रवेश संबंधित संस्थेला संस्थास्तरावरील जागेवर समायोजित करावा लागेल. असे करताना प्रवेश क्षमतेपेक्षा जादा प्रवेश झाल्यास त्यास हे संचालनालय जबाबदार राहणार नाही.

सही/-
( डॉ. एस के महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई